# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.७२४३/२१/अ.क्र.८७९१/२५/०१

**श्रीमती वैशाली मोहन पवार-बने**
रुम नं. ५८, श्रीकृष्ण नगर, वडाळा शिवडी क्रॉस रोड,
वडाळा, मुंबई – ४०००३१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासकीय अधिकारी ग्राहक सेवा (फ/दक्षिण)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता, ग्राहक सेवा (फ/दक्षिण) बेस्ट उपक्रम,
न्यू ॲन्सीलरी बिल्डींग, ३रा मजला, द्वार क्र. ६, वडाळा, मुंबई – ४०००३१.
**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता ग्राहक सेवा (फ/दक्षिण)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता, ग्राहक सेवा (फ/दक्षिण) बेस्ट उपक्रम,
न्यू ॲन्सीलरी बिल्डींग, ३रा मजला, द्वार क्र. ६, वडाळा, मुंबई – ४०००३१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०२.१२.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, श्रीमती संयुक्ता पवार व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, श्रीमती प्रमिला निकाळे उपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी दि. ०३.१२.२०२० रोजी "पत्ता – खोली क्र. २, चाळ क्र. ५९३, म्युनिसिपल चाळ, परेल भोईवाडा, मुंबई – ४०००१२ या वरील ठिकाणी असलेल्या घराचे मूळ मालक तुकाराम महादेव म्हात्रे यांच्या नावे असलेला व २२ मे, १९५४ रोजी बसविण्यात आलेला मिटर क्रमांक ४०७८१ व ग्राहक क्रमांक ३३९-२२६-००३ अशी सत्य परिस्थिती असतांना, सदर पत्यावरच वसंत रावजी नलावडे यांचे नाव तसेच २२.१२.१९७१ या एकाच तारखेला बसविण्यात आलेला मिटर क्रमांक ३४३२७६ व या मीटरला तीन वेगवेगळे ग्राहक क्रमांक ३३९-२२६-००४, ५७७-३८९-०२५*९ व ४५०-५१२-००७ हा सर्व बदल ज्या आधारावर आपल्या कार्यालयाकडून करण्यात आला याबाबतची माहिती आपल्या सही शिक्कयानिशी मिळावी", याबाबत माहितीची मागणी केली आहे. सदर माहितीचा कालावधी सन १९७१-१९७२ असा नमूद केला आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१२.२०२० रोजी त्यांच्या संगणकीय ग्राहक माहिती प्रणाली (CIS) मध्ये ग्राहक क्र. ३३९-२२६-००४ व ४५०-५१२-००७ ची माहिती उपलब्ध नाही, परंतु ग्राहक क्रमांक ५७७-३८९-०२५ ची माहिती सी.आय.एस स्वरुपात उपलब्ध आहे, असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे. तथापि आवश्यक असलेली माहिती न देणे,

दिशाभुल करणारी माहिती देणे, माहिती दडविणे, असमाधानकारक व अनावश्यक माहिती सादर करणे असा आक्षेप नोंदवित अपीलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दि. २८.०१.२०२१ रोजी दाखल केला आहे. त्यावर बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम येथील प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, ग्राहक सेवा, (फ/दक्षिण) यांनी सुनावणी घेतली असून अपीलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जातील नमूद कारणांचा पुर्नउच्चार केला असून जन माहिती अधिकारी यांनी या आधीच दिलेल्या उत्तराचा पुर्नउच्चार करीत ग्राहक क्रमांक ५७७-३८९-०२५ ची नोंद संगणकीय ग्राहक माहिती प्रणाली मध्ये उपलब्ध असून दि. २२.१२.१९७१ रोजी वसंत रावजी नलावडे यांचे नावावर बसविण्यात आला व जोडणी करण्यात आली होती. अर्थात हीच जोडणीचे कागदपत्रे सन १९७१ कालावधीतील असून खूप जुनी असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी कुठलीही माहिती दडविली नाही अथवा अपूर्ण दिली नाही, असे नमूद केले आहे. वरील सर्व बाबी नमूद करीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी "जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याचे" नमूद करीत ग्राहक क्रमांक ५७७-३८९-०२५ याची माहिती संगणकीय ग्राहक माहिती प्रणाली मध्ये उपलब्ध आहे ती विनामुल्य देण्याचे निर्देश दिले असून त्याप्रमाणे माहिती प्रदान केली आहे. अपीलार्थी यांनी दि. २४.०६.२०२१ रोजी द्वितीय अपील अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी सत्य माहिती दडविणे व लेखी स्वरुपात दिलेली माहिती उपलब्ध नसणे म्हणजेच दफतरी बनावट माहिती जतन केली असल्याचा असा आक्षेप नमूद केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी याच ग्राहक क्रमांक संदर्भात यापूर्वी जोडपत्र-अ, जोडपत्र-ब व द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून जन माहिती अधिकारी यांची भूमिका कलम २ (च) प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच प्रदान केली आहे. यात माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही. तसेच कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे ही बाब जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतीसाद व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारित केलेला आदेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींशी सुसंगत असून ही वस्तुस्थिती लक्षात घेता, तसेच जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपीलार्थी यांना यापूर्वीच प्रदान करण्यात आली असल्याचे प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०२.१२.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra